
# क्रांतिगुरु लहुजी साळवे

संपादक
डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे
डॉ. बालाजी समुखराव



क्रांतिगुरू लहुजी साळवे / २००
३१. सामाजिक उत्थानासाठीचा ऊर्जास्त्रोत - क्रांतिगुरू लहुजी साळवे / २००
अरुण कांबळे (शिंदीकर)
डी. व्ही. वाघमारे (अतनूरकर)
३२. लहुजी साळवे आणि लोकशाहीवादी मूल्ये / २०५
प्रकाश बाळु नाईक
३३. लहुजी साळवे यांची शिवराज्य संकल्पित स्वराज्यनिष्ठा / २०९
रमेश शेषराव करडे
३४. सामाजिक क्रांतीचे स्फूर्तीस्थान - देशभक्त लहुजी साळवे / २१५
डॉ. सोमनाथ डी. कदम
३५. महापुरुष घडवणारा शूरवीर योद्धा : क्रांतिगुरू लहुजी साळवे / २१९
डॉ. नरसिंग कदम
३६. सामाजिक क्रांतीचा महानायक - लहुजी साळवे / २२३
अंकुश सिंदगीकर
३७. सामाजिक क्रांतीचा प्रणेता आद्यक्रांतिवीर लहुजी साळवे / २२७
डॉ. वनमाला सोपानराव लोंढे
३८. बहुजनांच्या कल्याणासाठी समर्पित नेतृत्व :क्रांतिगुरु लहुजी साळवे / २३१
डॉ. बालाजी राजाराम समुखराव
३९. बहुजन चळवळीचे आधारस्तंभ लहुजी साळवे / २३७
डॉ. हारगे महादेव माणिकराव
४०. क्रांतिगुरु लहुजी साळवे यांचे स्त्री-विषयक विचार / २४१
मीनाक्षी गोणारकर
४१. समग्र क्रांतीचे निर्माते : लहुजी साळवे / २४४
डॉ. विष्णू कांबळे
४२. लहुजी साळवे सामाजिक क्रांतीचे प्रणेते / २४७
डॉ. एन. पी. कुडकेकर
४३. लहुजी साळवे आणि आजची स्त्री चळवळ / २५०
मेघश्री श्रेष्ठी-नाईक
४४. लहुजी साळवे यांचे सामाजिक परिवर्तनातील योगदान / २५३
उत्तम वाघमारे
४५. क्रांतिगुरु लहुजी साळवे आणि आम्ही / २५९
डॉ. लालबा चां. दुमटकर
४६. परिवर्तनवादी चळवळीचा वसा नि वारसा :
क्रांतिवीर लहुजी साळवे / २६३
डॉ. भगवान वाघमारे

# ३९.

# बहुजन चळवळीचे आधारस्तंभ लहुजी साळवे

**डॉ. हारगे महादेव माणिकराव**
शिरूर अनंतपाळ जि.लातूर
९४०५७३२७००

भारत विविधतेने नटलेला देश म्हणून ओळखला जातो. कारण भारतामध्ये विविध धर्मांचे, पंथाचे, जातीचे लोक राहतात. अशा या वैविध्यपूर्ण देशावर इंग्रजांनी दिडशे वर्षे राज्य केले. देशाला ब्रिटिश पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी भारतातील अनेक जाती समुहातील क्रांतिकारकांनी स्वातंत्र्य चळवळ उभा केली व पारतंत्र्याचा लढा अतिशय तीव्रपणे सुरु केला. म्हणजेच भारतातील अनेक जातीच्या तरुणांची भूमिका स्वातंत्र्य लढ्यामध्ये फार महत्त्वाची राहिलेली आहे. अशाच वेगवेगळ्या क्रांतिकारी जातीपैकी 'मांग' ही जात पूर्वीपासूनच मातृभूमीच्या रक्षणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आली आहे.

या गौरवशाली ऐतिहासिक शौर्याची परंपरा असलेल्या मांग समाजातील वीरपुरुषांनी अगदी शिवाजी महाराजांच्या काळापासून आणि त्यापूर्वीही आपल्या मातृभूमीचे रक्षण केले आहे. इतिहासाची पाने उलगडून पाहिली तर असे दिसून येते की, 'मांग' ही जात पूर्वीची राज्यकर्ती जात आहे. हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी शिवाजी महाराजांना मदत करणारे, स्वराज्यासाठी लढणारे बहुतांशी मावळे म्हणजे मांग रामोशी, बेरड या जातींचा भरणा जास्त असायचा. कारण यांना इतरांपेक्षा रानावनातील, कड्या कपारीतील रस्त्याची माहिती अचूक असायची. याशिवाय मातृभूमीसाठी यांची निष्ठा निःसंदिग्ध असायची. स्वराज्याचे पहिले सर सेनापती बाजी पासलकर यांचे अंगरक्षक येल्ल्या मांग होता. मुघलांच्या तोफा निकामी करणारे रायगडचे सर्जेराव मांगच होते, औरंगजेबाचे नामी सरदार शहाबुद्दीन खान आणि कासिम खान किरमानी यांच्याशी तब्बल एक वर्षे झुंज देऊन किल्ला लढविणारे रामशेज डोंगरी किल्ल्याचे किल्लेदार वीर बाबाजी नाईक म्हणजेच कृष्णाजी मांग होते. पन्हाळगडाच्या वेढ्यातून बिकट रस्ता काढून विशालगडावर शिवरायांना सुखरुप पोहचविणारे व पुढे कर्नाटकात उरफुटून मृत्यू येईपर्यंत शिवरायांना पालखीतून पळवित नेणारे निम्मे अधिक मांगच होते.

अशाच गौरवशाली ऐतिहासिक शौर्य परंपरा असणाऱ्या मांग समाजामध्ये

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजे १४ नोव्हेंबर १७९४ रोजी आद्यक्रांती गुरु, क्रांतिवीर लहुजी साळवे यांचा जन्म झाला. आईचे नाव विठाबाई तर वडिलांचे नाव राघोजी राऊत असे आहे. राऊत अडनावाचे कारण म्हणजे विशेषतः तलवार आणि दांडपट्टा चालविण्यात निष्णात असलेल्या या घराण्यास तलवार आणि दांडपट्ट्याच्या कर्तबगारीबद्दल शिवरायांनी 'राऊत' ही पदवी बहाल केली होती.

नोव्हेंबर १८१७ मध्ये झालेल्या इंग्रज पेशव्यांच्या लढाईत इंग्रजांची सरशी झाली आणि जवळपास तीनशे वर्षे टिकून असलेलं शिवरायाचं हिंदवी स्वराज्य संपुष्टात आलं. इंग्रजांविरोधी लढाईत क्रांतिवीर लहुजींचे वडील राघोजी आणि चोवीस वर्षांचे तरणेबांड लहुजी साळवे प्राणपणाने लढले. त्यात राघोजी इंग्रजांची गोळी लागून हुतात्मा झाले. इंग्रजांनी त्यांचा देह घोड्यांच्या टापाखाली तुडवला. हे सारं लहुजी आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत होते. तेव्हा लहुजीने प्रतिज्ञा केली. 'जगेन तर देशासाठी आणि मरेण तर देशासाठी' डोळ्यासमोर झालेल्या वडीलांच्या मृत्यूमुळे त्यांनी 'स्वातंत्र्यक्रांतीची' प्रतिज्ञा केली तीच स्वातंत्र्य चळवळीच्या क्रांतीची खरी सुरुवात होती.

स्वातंत्र्य चळवळींच्या प्रेरणेने क्रांतीवीर लहुजीने १८२२ मध्ये पुण्याच्या शनिवार पेठेतील गंजपेठ भागात व्यायाम शाळा सुरु केली. खरं तर हा काळ म्हणजे जाती विषमतेने बरबटलेला होता. एखाद्या दलिताने ब्राह्मणांच्या शहरात व्यायाम शाळा काढणे म्हणजे फार मोठे धैर्याचे काम होते. त्या काळी भारतीय समाजामध्ये अस्पृश्यता फार कट्टर होती. तरी सुद्धा अतिशय धैर्याने, हिमतीने क्रांतिवीर लहुजी साळवे यांनी आपले कार्य चालूच ठेवले.

सुरुवातीला मांग समाजातीलच तरुणांना संघटीत करुन त्यांना कुस्ती व शस्त्रास्त्राचे प्रशिक्षण देऊ लागले. पारतंत्र्याच्या काळी प्रत्येक तरुणाला मातृभूमीच्या रक्षणासाठी शस्त्रास्त्राचे प्रशिक्षण आवश्यक वाटू लागले व हळूहळू प्रत्येक जातीतील समाजातील तरुणांना स्वातंत्र्य चळवळींसाठी शस्त्रास्त्र शिक्षण घेण्यासाठी लहुजी साळवे प्रवृत्त करु लागले व आपल्या तालमित बहुजन समाजातील तरुणांना प्रशिक्षण देऊ लागले आणि हीच खऱ्या अर्थाने लहुजींच्या बहुजन चळवळींची सुरुवात म्हणता येईल. तालिम फक्त नावाला होती. खरे म्हणजे या तालमित निर्माण होत होते मातृभूमीचे रक्षण करणारे सच्चे सैनिक याला फक्त तालिम म्हणता येणार नाही तर देशाला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी 'क्रांतिकारी' तयार करण्याचे 'सैनिकी केंद्रच' म्हणावे लागेल. यातून क्रांतिगुरु लहुजींचा दृष्टेपणा दिसून येतो. कारण त्याकाळी जाती-धर्माची तरुण मुलं एकत्रित करणे हे साधं आणि सोपं काम मुळीच नव्हतं.

क्रांतिगुरु लहुजी साळवेंच्या बहुजन चळवळीची सुरुवात म्हणजे त्यांच्या तालमीमध्ये शस्त्र विद्येचे शिक्षण घेण्यासाठी भारतमातेच्या स्वातंत्र्याची स्वप्ने पहाणारी

अनेक थोर क्रांतिकारक येत असत. त्यामध्ये सदाशिवराव परांजपे, मोरे विठ्ठल वाळवेकर, गोवंडे, वासुदेव बळवंत फडके, हे येत असत. तसेच समाज सुधारक महात्मा फुले हे ही दांडपट्ट्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी येत. इथुनच लहुजींच्या बहुजन चळवळींचे स्वरुप व्यापक होत होते असे म्हणावे लागेल. त्या काळात ही सर्व मंडळी फक्त शस्त्रास्त्राचे धडे घेण्यासाठीच लहुजींकडे येत होती असे म्हणता येणार नाही तर त्या ठिकाणी लहुजींच्या मार्गदर्शनाखाली मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांच्या विरोधात डावपेच आखण्यासाठी येत असत. कारण स्वातंत्र्य चळवळीचे ते केंद्रच होते.

क्रांतिवीर लहुजी साळवेच्या तालमीतून ज्या-ज्या तरुणांनी प्रशिक्षण घेतले त्यांनी पुढे संपूर्ण देशात मोठी चळवळ सुरु केली सगळ्याच जाती-धर्मातील तरुणांना एकत्रित करुन देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी एक मोठा संघटीत लढा सुरु केला. संपूर्ण देशभर व्यापक असा लढा होता. वासुदेव बळवंत फडकेनी तर महाराष्ट्रामध्ये इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले होते. याचे संपूर्ण श्रेय निश्चितच क्रांतिगुरु लहुजी साळवेंना जायला हवे. कारण लहुजींच्या नेतृत्वातूनच वरील सर्व क्रांतीकारकांनी प्रेरणा घेतली होती. लोकमान्य टिळकांनी तर सर्व बहुजनांना एकाच छत्राखाली आणण्यासाठी गणपती उत्सव सुरु केला. त्यामुळे सर्व जाती-धर्मातील समाजातील लोक एकत्र येऊ लागले व एक नवी चळवळ उदयाला आली. अर्थातच क्रांतीगुरु लहुजी साळवे यांनी लावलेल्या बहुजन चळवळीच्या रोपट्याचं रुपांतर अनेक देशभक्त क्रांतिकारकांनी वटवृक्षात केलं या चळवळीच्या यशाचं गमक म्हणजे लहुजी साळवेच आहेत यात तिळमात्र शंका नाही.

या कार्याबरोबरच क्रांतिगुरु लहुजी साळवेंनी महात्मा फुलेच्या समाज सुधारणेच्या कार्यालाही फार मोलाचे सहकार्य केलेले आहे. लहुजींच्या तालमित प्रशिक्षण घेतलेले महात्मा फुले यांनी 'गोर गरीबांनी, अज्ञानी, अस्पृश्य बांधवानी शिक्षण घेतलं पाहिजे' म्हणून जो प्रचार केला त्या कार्यातही लहुजी साळवे हे सक्रिय होते. १८४८ साली महात्मा फुले यांनी पुण्यात पहिली मुलींची शाळा काढली. तेव्हा कोणीही शाळेत येत नव्हते म्हणून लहुजी साळवे हे स्वतः महात्मा फुले बरोबर तिथल्या वस्तीत जाऊन मुलांना शिकवायला सांगायचे व स्वतः सोबत जाऊन मुला-मुलींना शाळेत पाठवत असत. इतकेच नाही तर पुण्यात सुरु झालेल्या मुलींच्या शाळेत स्वतःची पुतणी मुक्ता साळवे यांना सर्वप्रथम शाळेत पाठवून महात्मा फुल्यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्यास जसे बळ दिले तसेच बहुजनांचे आत्मबलही वाढविले. पुढील काळात स्त्री शिक्षणाची जी भव्यदिव्य इमारत उभी राहिली त्या इमारतीच्या पायाखालचा दगड लहुजी साळवे होते हे कसे नाकारता येईल. मुलींच्या शाळेत सावित्रीबाई फुले शिकविण्यासाठी जात तेव्हा ब्राह्मणवादी, मनुवादी लोक त्यांना त्रास देत असत. त्यावेळेस सावित्रीबाईंना संरक्षण देण्याचे काम लहुजी साळवे यांनी केले. यातून त्यांचा

शिक्षणाविषयीचा दृष्टेपणा दिसून येतो.

खऱ्या अर्थाने अशा थोर क्रांतिगुरु लहुजी साळवे या महापुरुषांनी प्रतिकुल परिस्थितीत जी चळवळ निर्माण केली त्यामध्ये वेगवेगळ्या जाती, धर्मांचे लोक होते. मांग समाजापुरतीच ती चळवळ सिमित नव्हती म्हणून या चळवळीला पारतंत्र्याच्या काळातील 'बहुजन चळवळ' असे म्हणावे लागेल आणि हे त्रिवार सत्य आहे. अलिकडच्या काळात अनेक चळवळी निर्माण झालेल्या आहेत. परंतु त्या जातीवादी आहेत की बहुजनवादी आहेत हे निश्चित सांगता येत नाही. त्यातल्या त्यात चळवळी निर्माण करणारे हे सुशिक्षित आहेत. सांगायचा हेतू हा की या चळवळींना योग्य दिशाच नाही. म्हणून या चळवळी बहुजनवादी चळवळी आहेत का ? असा प्रश्न निर्माण होतो. काहीही शिक्षण नसलेले पण प्रतिकूल काळामध्ये समाजाला वेगळी दिशा देण्याचे काम आद्यक्रांतिगुरु लहुजी साळवे यांनी केले. इतिहासकारांनी लहुजी साळवे यांना दुर्लक्षित ठेवलेले दिसून येते. मनुवाद्यांनी पूर्वीपासून बहुजनाचा खरा इतिहास शक्य तो जगाला माहित न होऊ देण्याचाच प्रयत्न केलेला आहे हे प्रकर्षाने सांगावेसे वाटते. महाराष्ट्र निर्मितीच्या लढ्यामध्ये सुद्धा साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांनी शाहीर अमर शेख यांनी आपल्या सहकार्यांना घेऊन मुंबईसह महाराष्ट्र निर्मितीची चळवळ मोठ्या हिंमतीने निर्माण केली होती. अण्णाभाऊंच्या चळवळीचे स्वरुप हे लहुजी साळवे यांच्या चळवळीसारखेच होते म्हणून लहुजींनी निर्माण केलेल्या बहुजन चळवळीचा वारसा नंतर पुढे अण्णाभाऊंनी चालवला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

इ.स. १८८० मध्ये लहुजींचे आजारपण वाढत जात होते. जाता-जाता महात्मा फुलेंना आवर्जून सांगितले, "तुमचे कार्य असेच चालू राहू द्या तुमच्यामुळे आम्हा अतिशुद्रांना चांगले दिवस येतील." १७ फेब्रुवारी १८८१ रोजी या आद्यक्रांतीगुरुची प्राणज्योत मावळली. त्यांच्या शेवटच्या संदेशातून सुद्धा हेच दिसून येते की, त्यांनी सर्वांना एकत्र करुन जी चळवळ उभी केली होती ती अशीच चालावी अशी त्यांची ईच्छा होती. म्हणून बहुजन चळवळींचे आधारस्तंभ म्हणून आद्यक्रांतीगुरु, क्रांतीवीर लहुजी साळवेंचेच नाव द्यावे लागले.

**संदर्भ :**


१) चंद्रकांत वानखेडे, मातंग प्राचीनता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा, नेहा प्रकाशन, नागपूर.

२) प्रा. अंबादास सगट, गौरवशाली ऐतिहासिक शौर्य परंपरा आणि मातंग समाज, भारतीय विचार साधना, पुणे प्रकाशन, पुणे.

३) शिवा कांबळे, जे देशासाठी लढले, इसाप प्रकाशन, नांदेड.


⌘⌘⌘